|| श्री गणेशाय नमः ||

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

Astro • Puja • Vastu

ज्योतिष आणि वास्तु सल्लागार

## गजानन महाराज आरती

जय जय सत्चित्स्वरूपा स्वामी गणराया । अवतरलासी भूवर जड-मुढ ताराया । ।। जयदेव जयदेव ।।धृ।।
निर्गुण ब्रह्म सनातन अव्यय अविनाशी । स्थिरचर व्यापुन उरलें जे या जगताशी । तें तूं तत्व खरोखर निःसंशय असती ।
लीलामात्रे धरिलें मानवदेहासी । ।। जयदेव जयदेव ।।१।।

होऊं न देशी त्याची जाणिव तूं कवणा । करूनी गणि गण गणांत बोते या भजना । धाता हरिहर गुरूवर तूंचि सुखसदना ।
जिकडे पहावे तिकडे तूं दिससी नयना । ।। जयदेव जयदेव ।।२।।

लीला अनंत केल्या बंकट सदनास । पेटविले त्या अग्नीवांचूनी चिलमेस । क्षणांत आणिलें जीवन निर्जल वापीस ।
केला ब्रह्मगिरीच्या गर्वाचा नाश । ।। जयदेव जयदेव ।।३।।

व्याधी वारून केलें कैका संपन्न । करविले भक्तालागी विठ्ठल-दर्शन । भवसधु हा तरण्या नौका तव चरण ।
स्वामी दासगणूंचे मान्य करा कवन । ।।जयदेव जयदेव ।।४।।

### गजानन महाराज आरती

श्रीमत् सद्गुरु स्वामी जय जय गणराया । आपण अवतरला जगि जड जिव ताराया ।। ध्रु. ।।
ब्रह्म सनातन जे का तें तूं साक्षात। स्थावरजंगमि भरला तुम्हि ओतप्रोत।
तव लीलेचा लागे कवणा नच अंत । तुज वानाया नुरले शब्दहि भाषेत ।।1।।

वरिवरि वेडेपण ते धारण जरि केले । परि सत्सवरुपा आपुल्या भक्तां दाखविले।।
निर्जल गर्दाडसी जल ते आणविले ।। विहंग नभीचे काननि आज्ञेत वागविले ।।2।।

दांभिक गोसाव्यातें प्रत्यय दावून । ज्ञानिपणाचा त्याचा हरिला अभिमान।।
ओंकरेश्वर क्षेत्री साक्षात् दर्शन।। नर्मदेने भक्तां करवियले रक्षण ।।3।।

अगाध शक्ती ऐशी तव सद्गुरुनाथा ।। दुस्तरशा भवसागरि तरण्या दे हाता।।
वारी सदैव अमुची गुरुवर्या चिंता । दासगणूच्या ठेवा वरद करा माथा ।।4।।


**HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA**

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 95944 28749 | निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 86524 02078

**SANPADA OFFICE**
Office No.8, 1st Flr, Shiva Triveni Galleria CHS.,
Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar
Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com